| **Publication** – Deshdoot | **Page No** - 09 |
|---|---|

कार्यकर्त्यांना केले आहे.

# 'इंडिया रबर एक्स्पो'चे मुंबईत आयोजन

■ नवीन नाशिक । दि. ७ प्रतिनिधी

भारतीय उद्योग क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकाचा उद्योग म्हणून गतिमान असलेला रबर उद्योग जागतिक स्तरावर सर्वात मोठे रबर केंद्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असून त्यासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या 'इंडिया रबर एक्स्पो-२०१९' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन २०१९च्या वर्षारंभी मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे करण्यात आले असल्याची माहिती प्रदर्शनाचे मुख्य आयोजक विष्णू भीमराजका यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इंडिया रबर एक्स्पो हा आशिया खंडातील सर्वात मोठा व जागतिक स्तरावरील सर्वात मोठ्या पहिल्या चार एक्स्पोमधील एक असून या एक्स्पोमुळे भारतीय रबर उद्योजकांना आंतरराष्ट्रीय उद्योगांची भेट घेण्यासाठी व त्यांच्याशी सहयोग करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रदर्शनात भारतासह आंतरराष्ट्रीय रबर उद्योगातील ३००च्या वर उद्योजक सहभागी होणार असून भारतीय रबर उद्योगाच्या गरुड भरारीची पायाभरणी या प्रदर्शनामुळे होणार असल्याचे प्रदर्शन आयोजन समितीचे अध्यक्ष विक्रम मकर यांनी सांगितले. या प्रदर्शनाच्या प्रोत्साहनासाठी भारतातील १५ शहरांमध्ये रोड शोचे आयोजन करण्यात आले आहे. या रोडशोच्या माध्यमातून प्रदर्शनाची माहिती पोहोचविणे व उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेला विनोद बंसल, उमेश ध्रुव, विनोद पटकोटवार, येझदी पटेल, निधी सेखसरिया आदी मान्यवर उपस्थित होते.